# महाराष्ट्र शासन

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती

प्लॉट नं. १०७, एम.आय.डी.सी. आवार, महिला रुग्णालया समोर, बारामती, जि. पुणे-४१३१३३.

PHONE NO. ०२११२-२४४१३७ E-MAIL ID- deangmcbaramati@gmail.com


जा.क्र./परिचर्या महाविद्यालय कार्यासन/बारामती/२६०३/२६ दि.०६/०७/२०२६

## जाहिरात सुचना

या जाहिर सुचनेद्वारे कळविण्यात येते की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय बारामती संलग्नित **शासकीय परिचर्या महाविद्यालयाच्या वसतिगृहाकरिता** शासकीय नियमांनुसार व विहित अटींच्या अधीन राहून, महाविद्यालयापासून जवळ असणाऱ्या खाजगी इमारत धारकांकडून इमारत भाडेतत्त्वावर घेण्यासाठी सीलबंद पाकिटात अर्ज मागविण्यात येत आहेत.

**१. इमारतीचा आवश्यक तपशील:**

- **अंतर:** शासकीय परिचर्या महाविद्यालय,बारामती पासून इमारत **[उदा. ० ते १.५ किमी]** च्या परिघात असावी.
- **क्षेत्रफळ:** इमारतीचे एकूण चटई क्षेत्रफळ (CARPET AREA) अंदाजे **[क्षेत्रफळ ७००० ते १००००+]** चौ.फूट असावे.
- **रचना:** इमारतीमध्ये कार्यालयीन कामकाज, ग्रंथालय आणि विद्यार्थ्यांच्या वसतिगृहासाठी पुरेशी जागा व स्वतंत्र प्रसाधनगृहे (TOILETS) असावीत.
- **सुविधा:** २४ तास पिण्याचे पाणी, अखंडित वीज पुरवठा (पॉवर बॅकअपसह), आणि पार्किंगसाठी पुरेशी जागा असणे अनिवार्य आहे.

(टीप- वरील अंतर,क्षेत्रफळ,रचना व सुविधा हे अंदाजित असून अंतिम निर्णय तपासणीअंती घेण्यात येईल)

**२. आवश्यक कायदेशीर कागदपत्रे:**

- इमारतीचा सक्षम प्राधिकरणाने मंजूर केलेला नकाशा (Approved Plan).
- इमारतीचा भोगवटा प्रमाणपत्र / पूर्णत्वाचा दाखला (Completion/Occupancy Certificate).
- चालू आर्थिक वर्षाचा मालमत्ता कर भरल्याची पावती.
- अद्ययावत अग्निशमन सुरक्षा प्रमाणपत्र (Fire Safety Certificate).
- इमारतीचे निर्दोष मालकी हक्क (Clear Title Deed) आणि ७/१२ उतारा किंवा मालमत्ता पत्रक (Property Card).

**३. अर्ज करण्याची पद्धत:**

- इच्छुक इमारत धारकांनी आपला अर्ज विहित नमुन्यात **दिनांक ०७/०७/२०२६ ते दिनांक दिनांक १५/०७/२०२६** रोजी **सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** शासकीय परिचर्या महाविद्यालय,बारामती येथे कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष उपस्थित राहून सादर करावा. सोबत विहीत अर्जाचा नमुना जोडलेला आहे.
  (वरील मुदतीत पुरेसे अर्ज न आल्यास मुदतवाढीबाबत वेगळी सुचना देण्यात येईल)
- विहित मुदतीनंतर आलेल्या व ईमेलद्वारे अथवा पोस्टाने अर्ज सादर करु नयेत सदर अर्जाचा विचार केला जाणार नाही.
- इमारतीचे मासिक भाडे हे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (PWD) चालू मूल्यांकन नियमांनुसार निश्चित केले जाईल. त्यामुळे सदर भाडे हे अर्जदार यांना मान्य करणे बंधनकारक राहील.

कोणताही अर्ज स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा संपूर्ण अधिकार खालील स्वाक्षरी करणाऱ्या प्राधिकरणाने स्वतःकडे राखून ठेवला आहे. तसेच एकदा अर्ज सादर केल्यानंतर सदर प्रक्रियेतून माघार घेता येणार नाही याचीही अर्जदार यांनी नोंद घ्यावी.

अधिष्ठाता
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती.

प्रत:-

१. महाविद्यालय संकेतस्थळ प्रमुख, यांना कळविण्यात येते की सदर जाहिरात संकेतस्थळावर तात्काळ प्रसिद्ध करावी.
२. महाविद्यालय व रुग्णालय सुचना फलक
३. नि:शुल्क प्रसिद्धी देणारी स्थानिक वृत्तपत्रे, बारामती .

# इमारत भाडेतत्त्वावर देणेबाबतचा विहित अर्ज नमुना

प्रति,
मा. अधिष्ठाता
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती.

**विषय:** शासकीय परिचर्या महाविद्यालय व वसतिगृहाकरिता खाजगी इमारत भाडेतत्त्वावर देणेबाबत अर्ज.
**संदर्भ:** आपली जाहिरात क्रमांक: ................दिनांक: ............................

महोदय/महोदया,

आपल्या उपरोक्त संदर्भीय जाहिरातीच्या अनुषंगाने, माझी/आमची इमारत शासकीय परिचर्या महाविद्यालय बारामती वसतिगृहासाठी भाडेतत्त्वावर देण्यास मी/आम्ही तयार आहोत. इमारतीचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे आहे:

**१. अर्जदार व इमारतीचा सर्वसाधारण तपशील:**

- **१.१ इमारत मालकाचे/धारकाचे नाव:** ........................................................................
- **१.२ संपूर्ण पत्ता (संपर्कासाठी):** ........................................................................
- **१.३ मोबाईल नंबर व ईमेल:** ...................................................................................
- **१.४ भाड्याने द्यावयाच्या इमारतीचा पत्ता:** ...................................................................
- **१.५ शासकीय परिचर्या महाविद्यालयापासूनचे अंतर (किमी मध्ये):** ...............................

**२. इमारतीचा तांत्रिक तपशील:**

- **२.१ इमारतीचे एकूण चटई क्षेत्रफळ (Carpet Area):** ........................................ चौ. फूट.
- **२.२ मजल्यांची संख्या (No. of Floors):** ........................................................................
- **२.३ एकूण खोल्यांची संख्या (हॉल/मोठ्या रूम्ससह):** ......................................................
- **२.४ प्रसाधनगृहांची संख्या (Toilets/Bathrooms):** स्वतंत्र (महिला): ........... स्वतंत्र (पुरुष): ...........
- **२.५ इमारत बांधकामाचे वर्ष:** ............................

**३. उपलब्ध पायाभूत सुविधा (कृपया 'आहे' / 'नाही' अशी नोंद करावी):**

- ३.१ २४ तास पिण्याच्या व वापराच्या पाण्याची सोय: [ ]
- ३.२ स्वतंत्र 1-फेज वीज जोडणी व वीज पुरवठा (पॉवर बॅकअप): [ ]
- ३.३ अग्निशमन यंत्रणा व सुरक्षा व्यवस्था: [ ]
- ३.४ स्वतंत्र पार्किंग व मोकळी जागा: [ ]
- ३.५ उद्वाहन (Lift) सुविधा (इमारत ३ मजल्यांपेक्षा जास्त असल्यास): [ ]

**४. आवश्यक कागदपत्रांची यादी (अर्जासोबत जोडलेले पुरावे - कृपया टिक करावे):**

- [ ] इमारतीचा सक्षम प्राधिकरणाने मंजूर केलेला नकाशा (Approved Plan)
- [ ] भोगवटा प्रमाणपत्र / पूर्णत्वाचा दाखळा (Completion/Occupancy Certificate)
- [ ] इमारतीचे मालकी हक्क पुरावे (७/१२ उतारा / मालमत्ता पत्रक / खरेदीखत)
- [ ] अद्ययावत मालमत्ता कर भरल्याची पावती (Tax Receipt)
- [ ] वैध अग्निशमन सुरक्षा प्रमाणपत्र (Fire Safety Certificate)
- [ ] इमारत मालकाचे पॅन कार्ड आणि आधार कार्ड छायाप्रत

**५. प्रतिज्ञापत्र व हमी:**

मी/आम्ही याद्वारे जाहीर करतो की, वर दिलेली सर्व माहिती सत्य आणि अचूक आहे. ही इमारत सर्व प्रकारच्या कायदेशीर वादांतून मुक्त असून इमारतीचे मासिक भाडे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (PWD) चालू मूल्यांकन नियमांनुसार स्वीकारण्यास माझी/आमची संमती आहे. अर्ज सादर केल्यानंतर सदर प्रक्रियेतून माघार घेणार नाही याची हमी देत आहे.

**दिनांक:** ............................
**स्थान:** ............................

**अर्जदाराची/इमारत मालकाची स्वाक्षरी:**
**(नाव:**
**(..........................................................................)**